जावक क्र. B/ ५० , दिनांक २१ । ५ । १९७६.

मा. शिक्षणप्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ५.
यांजकडून

~~मा./श्री.~~ मुख्याध्यापक,
कर्नाटक हायस्कूल,
५५-५७ डॉक्टर केतकर रोड.
एरंडवणा, पुणे-४. यांजकडे

विषय : इंग्रजी माध्यमाची इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी ची प्रत्येकी एक तुकडी वाढविण्यास परवानगी देणेबद्दल.

संदर्भ : आपले पत्र जा. क्र. २४० दिनांक - १७-५-७६.

उपरोक्त विषयाबाबत आपले वरील संदर्भांकित पत्रावरून कळविण्यांत येते कीं, जून १९७६ पासून तुमचे शाळेत इंग्रजी माध्यमाची इयत्ता १ ली ते ४ थी प्रत्येकी एक तुकडी वाढविण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

कळावे. दि० २१-५-७६.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

प्रत :- मा. शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे.
यांजकडे माहितीसाठी ---

Recd
24/5/76

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे म.न.पा.
जा.क्र. ६०८०
पुणे दिनांक. १६/३/९१.
२६

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,

कर्नाटक इंग्लीश स्कूल.
एरंडवणे पुणे.

यांस --

विषय - जादा वर्ग तुकडीस परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ - मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे जा.क्र. —
प्रा/प्राशि/जा.तु./पी.आर./ दि. ~~१५/३/९१~~ २१/२/९१

उपरोक्त विषयाबाबत तुमचे संदर्भांकित पत्रानुसार तुमचे शाळेस माहे ..जून.... सन १९९० पासून इयत्ता १ ली. ते ४ थी प्रत्येकी वी एक जादा वर्ग सुरु करणेस खालील शर्तींवर मान्यता देण्यात येत आहे.

१. शासकिय नियमानुसार प्रशिक्षीत शिक्षक/शिक्षिका नेमण्याची व्यवस्था करावी.

२. सदर सेवकांचे वय शासन नियमानुसार असावे.

३. शासन नियमानुसार मागास वर्गीयांचे प्रमाण सदर शिक्षक नेमताना पूर्ण करावे.

४. सदर वर्गात नियमाप्रमाणे विद्यार्थी संख्या असावी.

कळावे, दि. १६/३/९१

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ, पुणे महानगरपालिका.

एसजी.

जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/तु.मा./पुणे/ ११-२०००
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 5 DEC 2000

प्रति,

१] शिक्षणाधिकारी[प्राथमिक],
जिल्हा परिषद,

२] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

३] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

विषय :- मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत. [माध्यम- इंग्रजी ]

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना/शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग जून, १९९९ पासून सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यांत आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नांव. | माध्यम. | इयत्ता. | तुकडी वाढ. जादा/नैसर्गिक. | शेरा. मंजूर/नामंजूर. |
|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. कलमाडी शामराव हायस्कूल, ५५/१०, डॉ. केतकर रोड, एरंडवणे, पुणे-४ | इंग्रजी | इ. १ ते ४ थी ची पुढिल ४थी तुकडी. | अतिरिक्त | मंजूर |

अटी व शर्ती.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
२] सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.
३] सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय कांमनी असावयास हवी.
४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या पुरेशा असणे आवश्यक आहे.
७] तपासणी अंती एक जरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता.

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर,पुणे – ४११ ००५,
जा.क्र./खाप्राशा/ ४८५० /२०००–२००१,
पुणे,दिनांक :– १५.१२.२०००.

शाळाप्रमुख,
डॉ. शामराव कलमाडी लायस्कूल
५५/५७, डॉ केतकर रोड, एरंडवने
पुणे-४११००४

विषय :– मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढ/नैसर्गिकवाढीच्या प्रथम/जादा तुकडया वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत [इंग्रजी माध्यम]

संदर्भ :– मा.शिक्षण उपसंचालक यांचेकडील पत्र जा.क्र./प्रा/ १४७०५ प्राशि/खाप्राशा/तु.मा./पुवि/दि. ५.१२.२०००.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता तुमचे शाळेस खाली दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा/प्रथम/जादा तुकडयांचा वर्ग जून पासून सन १९९९-२०००या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी | इ. १ली ते ४थीची प्रत्येकी | ४ थी तुकडी | विना अनुदान तत्वावर मंजूर |

* अटी व शर्ती :–

१] सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक,शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधाउपलब्ध करून दयावयास हव्यात.
२] शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.
३] शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा-शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४] सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.